| MHSN030010252024 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | ०४/०४/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | २२/०४/२०२४ |
| | निकाल दिनांक | २०/०३/२०२६ |
| | कालावधी | ०१ वर्ष, ११ महिने, १६ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. ०४, सांगली यांचे न्यायालयात**

**(पिठासीन न्यायाधीश जुबेर शब्बीर मकानदार)**

गु.र.नं. ३४९/२०२३, सांगली ग्रामीण पोलिस ठाणे, सांगली.

| | |
|---|---|
| अभियोग पक्षामार्फत | सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. आर. पालकर |
| आरोपी | **नाव– १. प्रकाश गणपतराव देसाई,**<br>वय– ६५ वर्षे,<br>**नाव– २. प्रशांत प्रकाश देसाई,**<br>वय– ३८ वर्षे,<br>**नाव– ३. बेबीताई प्रकाश देसाई,**<br>वय– ५५ वर्षे,<br>**नाव– ४. महेश नारायण देसाई,**<br>वय– ३६ वर्षे,<br>सर्व आरोपी रा. धनगर गल्ली, नांद्रे,<br>ता. मिरज, जि. सांगली. |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | श्री. ए. एम. पटेल. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/११/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | १५/११/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०४/०४/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | १५/०७/२०२४ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | २०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| अ.नं | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हा कलम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश गणपतराव देसाई | दिनांक १६/११/२०२३ रोजी फौ. प्र. संहिता कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | -- | भारतीय दंड विधान संहिताचे कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४. |
| २. | प्रशांत प्रकाश देसाई | "............." | "............." | "............." |
| ३. | बेबीताई प्रकाश देसाई | "............." | "............." | "............." |
| ४. | महेश नारायण देसाई | "............." | "............." | "............." |

| ६ | ७ | ८ |
|---|---|---|
| **निर्दोष सोडले अथवा शिक्षा दिली** | **ठोठावलेली शिक्षा** | **संपरीक्षेदरम्यान आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याचा कालावधी** |
| निर्दोष मुक्तता | --- | --- |

## भाग क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | भारती भारत गिड्डे | फिर्यादी |
| साक्षीदार क्र. २ | प्रसाद शिवाजी बंडगर | पंच |
| साक्षीदार क्र. ३ | भारत विजय गिड्डे | साक्षीदार |
| साक्षीदार क्र. ४ | शितल विष्णू मस्कर | पंच |
| साक्षीदार क्र. ५ | प्रिती भारत गिड्डे | साक्षीदार |
| साक्षीदार क्र. ६ | दिलीप मारूती माने | साक्षीदार |
| साक्षीदार क्र. ७ | राहुल आण्णा कोळी | पंच |
| साक्षीदार क्र. ८ | डॉ. महानंदा मधुकर हुबाले | वैदयकीय अधिकारी |
| साक्षीदार क्र. ९ | संतोष बाबूराव माने | तपासी अंमलदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी–१/पी.डब्ल्यू–१ | फिर्याद |
| २. | पी–२/पी.डब्ल्यू–२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | पी–३/पी.डब्ल्यू–४ | जप्ती पंचनाम्यावरील अ. क्र. २ वरील पंचांची स्वाक्षरी |
| ४. | पी–४/पी.डब्ल्यू–७ | जप्ती पंचनाम्यावरील अ. क्र. १ वरील पंचांची स्वाक्षरी |
| ५. | पी–५/पी.डब्ल्यू–८ | जखमी नामे भारत गिड्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | पी–६/पी.डब्ल्यू–८ | जखमी फिर्यादी भारती गिड्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | पी–७/पी.डब्ल्यू–९ | गुन्हा तपासण्याचा लेखी आदेश |
| ७. | पी–८/पी.डब्ल्यू–९ | जप्ती पंचनामा |
| ८. | पी–९/पी.डब्ल्यू–९ | जखमीचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता वैदयकीय अधिकारी यांना करण्यात आलेले पत्र |
| ९. | पी–१०/पी.डब्ल्यू–९ | गुन्हयास वाढीव कलम लावल्याबाबत दिलेले पत्र |

**ब. बचाव**

| अ.नं | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन निशाणी**

| अ.नं | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.नं | वस्तु क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.ओ-१/पी.डब्ल्यू-३ | जप्त मुद्देमाल काठी |

## न्यायनिर्णय
## (घोषीत दिनांक २०/०३/२०२६)

**१.** उपरोक्त आरोपी यांच्या विरूध्द भारतीय दंड विधानाचे (थोडक्यात भा. द. वि.) कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४ खाली शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरून संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाचे कथन -**

**२.** भारती भारत गिड्डे (फिर्यादी) या त्यांच्या कुटुंबासह धनगर गल्ली, नांद्रे, ता. मिरज, जि. सांगली येथे राहण्यास आहेत. त्या सांगली पारेख मेडीकल येथे काम करतात. त्यांच्या शेजारी प्रकाश गणपती देसाई हे त्यांच्या कुटुंबासह राहण्यास असून त्यांच्यात व फिर्यादी यांच्यात जाण्या येण्याच्या रस्त्याच्या कारणावरून किरकोळ वाद झाले आहेत.

**३.** दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास दिवाळीच्या सणानिमित्त त्यांच्या दोन मुली त्यांच्या अंगणात फटाके वाजवत होत्या. त्यावेळी त्यांच्या शेजारी राहणारे प्रकाश गणपतराव देसाई हे शिव्या देत त्यांच्या अंगणात आले व त्यांचे पती भारत विजय गिड्डे यांना "आमची जनावर फटाक्याच्या आवाजाने

भुजतात, तुम्ही फटाके वाजवण्याचे बंद करा, नाहीतर आता तुम्हाला सोडत नाही" असे म्हणून दमदाटी करू लागले. त्यावेळी त्यांचे पती भारत यांनी त्यांना "माझ्या मुली दिवाळी सणामुळे लहान फटाके उडवत आहेत, त्यांना मी फटाके वाजवण्याचे बंद करण्यास सांगतो" असे सांगत असताना प्रकाश देसाई हे त्यांना "तुझे हे नेहमीचेच आहे, तु आमचा रस्ता ही वापरतोस, पुन्हा त्या रस्त्यावरून फिरकायचे नाही, नाहीतर तुम्हाला सोडणार नाही" असे म्हणुन त्यांनी फिर्यादी यांचे पती भारत यांना लाथाबुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी प्रकाश देसाई यांचा मुलगा प्रशांत देसाई हा काठी घेवुन आला. त्याच्या सोबत त्याची आई बेबी व चुलत भाऊ महेश नारायण देसाई असे शिवीगाळी करत त्यांच्या दारात आले व प्रशांत देसाई व महेश देसाई या दोघांनी त्यांच्या पतीस मारहाण करण्यास सुरुवात केली.

४. प्रशांत देसाई याने त्याच्या हातातील काठीने त्यांच्या पतीस मारहाण करताना ते सोडवण्यासाठी फिर्यादी व त्यांची मुलगी जात असताना प्रकाश देसाई यांची पत्नी बेबी हिने तिचा मुलगा प्रशांत देसाई ह्याच्या हातातील काठी घेवुन फिर्यादी यांच्या मुलीला दमदाटी करत फिर्यादी यांच्या हातापायावर काठीने मारण्यास सुरुवात केली. सदर वादामध्ये फिर्यादी यांच्या पतीचे पाठीवर, मांडीवर काठीचा मार बसला असुन फिर्यादी यांच्या डाव्या हाताचा अंगठा व त्या जवळील बोटास दुखापत झाली. सदरचा वाद सुरु असताना फिर्यादी यांच्या शेजारी राहणारे नामदेव माने, ओंकार माने, सोन्या माने, दिलीप माने यांनी मध्यस्थी करून वाद मिटवला. त्यानंतर फिर्यादी या सांगली ग्रामीण पोलीस ठाणेत तक्रार देण्याकरीता गेल्या असता त्यांना वैदयकीय उपचाराकरीता सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवण्यात आले व उपचार घेऊन आल्यानंतर त्यांनी वर नमूद घटनेबाबत सर्व आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

५.    फिर्यादीच्या पहिल्या वर्दीवरून सांगली ग्रामीण पोलीस यांनी गुन्हा नोंद क्र. ३४९/२०२३ प्रमाणे भा. द. वि. चे कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविला व तपास अंति दोषारोप पत्र दाखल केले.

**दोषारोप व आरोपीचे म्हणणे –**

६.    सदर गुन्हयाचा तपास हा संतोष माने पोहेकॉ/१९२८ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास अंति दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले.

७.    सदर आरोपींविरूध्द भादविचे कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४ अन्वये दोषारोप निशाणी क्र. १८ ला ठेवण्यात आले आहे. सदरचे दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून दाखविले. आरोपींनी गुन्हा मान्य नसलेचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली. आरोपींचे फौ. प्र. सं. कलम ३१३ प्रमाणचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र. ५५ ते ५८ वर नोंदवण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांना खोटया गुन्हयात गोवण्यात आल्याचे सांगितले आहे.

८.    उभयपक्षाचे विरोधी कथनावरून न्यायालयासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेः–

| अ. क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपी क्र. १ ते ४ यांनी सामाईक उद्देश्याने दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री २२.०० वाजण्याच्या सुमारास नांद्रे येथील धनगर गल्ली येथे फिर्यादी यांच्या घरासमोर फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्कयांनी मारहाण करून उद्देश पुर्वक दुखापत केली आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२३** | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | **सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला?** | |
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी यांनी समान उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी याने फिर्यादी व साक्षीदार यांना प्राणघातक असलेले हत्यार काठी याने मारहाण करून त्यांना गंभीर जखमी केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी फिर्यादी व इतर साक्षीदार यांना उद्वेश पुर्वक शिवीगाळी करुन त्यांना प्रक्षोभित केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |
| ५. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदार यांना दमदाटी करण्याचे कृत्य केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ६. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

९. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. आर. पालकर व आरोपींतर्फे वकील श्री. ए. एम. पटेल यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ६ बाबतः–**

१०. मुद्दा क्र. १ ते ६ वरील पुरावा एकामेकांशी संलग्नीत असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यावरती एकत्रित रित्या विवेचन घेत आहे.

११. आरोपींविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना प्राणघातक शस्त्र असणा–या काठीने व लाथाबुक्कयांनी मारहाण करून त्यांना उद्देशपुर्वक दुखापत करून गंभीर जखमी केले व त्यांना शिवीगाळी करून व दमदाटी करण्याचे कृत्य केले. सदर बाब सिध्दीकरीता अभियोगपक्षाने एकुण नऊ साक्षीदार तपासलेले आहेत. त्यामध्ये साक्षीदार क्र. १ भारती भारत गिड्डे यांना निशाणी क्र. ३१ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे या खटल्याचे फिर्यादी साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १४/११/२०२३ रोजी सदर घटना ही रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराच्या अंगणात घडली. त्यांना दोन मुली आहेत. सदर दिवशी व वेळी त्यांच्या दोन मुली त्यांच्या घराच्या अंगणामध्ये दिवाळी सणानिमित्त फटाके उडवत होत्या. त्यावेळी आरोपी प्रकाश देसाई हे त्यांच्या घरातून शिव्या देत त्यांच्या अंगणामध्ये आले व त्यांचे पती भारत गिड्डे यांना "फटाके उडवायचे बंद करा, आमचे जनावरे फटाक्यांच्या आवाजाने भूजतात" असे म्हणून शिवीगाळी व दमदाटी करण्यास सुरूवात केली.

त्यावेळी प्रकाश देसाई यांचा आवाज ऐकून त्यांची पत्नी बेबी देसाई, मुलगा प्रशांत देसाई व पुतण्या महेश देसाई हे देखील त्या ठिकाणी येऊन त्यांनी त्यांच्या पतींना दमदाटी करण्यास सुरुवात केली. प्रशांत देसाई यांनी त्यांच्या पतींना काठीने मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी बेबी देसाई यांनी प्रशांत देसाई यांच्या हातातील काठी काढून घेऊन त्या काठीने त्यांना व त्यांच्या मुलीला दमदाटी करून मारहाण केली.

१२. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, सदर वादामध्ये त्यांच्या पतीच्या मांडीवर, पाठीवर काठीचे वार झाले होते व त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठयाला व बोटाला दुखापत झाली होती. त्यांच्या डाव्या हाताचे बोट सदर मारहाणीत मोडले होते. सदर वाद हा त्यांचे शेजारी राहणारे ओंकार माने, दिलीप माने व सोन्या माने यांनी येऊन वाद मिटवले. त्यानंतर त्या सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवण्याकरीता गेल्या असता पोलीसांनी प्रथमतः त्यांना सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे उपचाराकरीता पाठवले. सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे उपचार घेऊन आल्यानंतर त्यांनी सदर आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. त्यांना दिनांक १५/११/२०२३ रोजीची फिर्याद दाखवली असता त्यांनी त्यावर त्यांची सही व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केलयाने सदर फिर्यादीस निशाणी पी–१ देण्यात आली आहे. सर्व आरोपींना त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे. ज्या काठीने आरोपींनी त्यांना मारहाण केली ती काठी दाखवल्यास त्या ती ओळखू शकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर फिर्यादी साक्षीदार हा जप्त मुद्देमाल काठी ओळखण्याच्या मुद्दयावरून अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सदर मुद्दयावरून सरकारी वकिलांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने त्यावर नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

**१३.** सदर साक्षीदाराचा आरोपींच्या विधीज्ञांमार्फत विस्तृत उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सदर साक्षीदाराने सध्या त्या ज्या ठिकाणी राहतात तेथे त्यांचे व शेजारी आरोपी देसाई यांची दोन घरे असल्याचे मान्य केले आहे. दिनांक १५/११/२०२३ रोजी दिवाळी पाडव्याचा सण असल्याने गावामध्ये सर्वत्र फटाके उडवले जात असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्या पोलीस ठाण्यात दिनांक १५/११/२०२३ नंतर तीन ते चार वेळेस गेल्या असल्याचे व प्रत्येक वेळी पोलीसांना जे काही घडले ती वस्तुस्थिती सांगितले असल्याचे सांगितले आहे. दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास त्यांचे पती भारत गिड्डे हे फटाके वाजवत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. आरोपी यांनी त्यांचे पती भारत गिड्डे यांना आरोपी यांचे जनावरे घाबरत असल्याकारणाने फटाके वाजवू नका अशी विनंती केली असल्याचे, तसेच त्यावेळी त्यांचे पती यांनी "तुम्ही काय आम्हाला विचारून शेळया पाळल्या आहेत का" असे आरोपींना म्हणाले असल्याचे व त्यांच्या पतींनी आरोपी यांना लाथाबुक्कयांनी मारहाण करण्यास सुरुवात केली असल्याचे त्यांनी नाकारले आहे. ओंकार माने, सोन्या माने, नामदेव माने हे त्यांच्या पतींचे मित्र असल्याचे मान्य करून ते सर्व व फिर्यादी हे एकामेकांच्या अडीअडचणीला मदत करत असल्याचे मान्य केले आहे. दिनांक १४/११/२०२३ रोजी त्यांच्या पतींनी आरोपी प्रकाश देसाई यांना मारहाण केली म्हणून आरोपी त्यांच्या पतीविरुध्द तक्रार देतील म्हणून त्यांनी सदरची खोटी फिर्याद आरोपी यांच्याविरुध्द नोंदवली असल्याचे नाकारले आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ प्रसाद शिवाजी बंडगर यांना निशाणी क्र. ३४ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हा पंच साक्षीदार असून त्याने त्याच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी त्यांना पंचनाम्याकरीता भारती गिड्डे यांच्या घरासमोर पोलीसांनी बोलावले होते. त्यावेळी दुसरे पंच हे सुनिल सदाशिव माने हे त्यांच्यासोबत उपस्थित होते. सदर

घटनास्थळ हे धनगर गल्ली येथे होते व ते मारहाण झाल्याचे ठिकाण होते. सदर घटनास्थळ त्यांना फिर्यादी भारती गिड्डे यांनी दाखवले होते. त्याप्रमाणे पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला. त्यांना दिनांक १५/११/२०२३ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यातील मजकूर व त्यावरील सही मान्य केली असल्याने सदर पंचनाम्यास निशाणी पी–२ देण्यात आली आहे.

**१५.** सदर पंच साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये भारत गिड्डे व त्यांचे चांगले संबंध असल्याचे व साक्ष नोंदवण्याकरीता ते भारत गिड्डे यांच्यासोबतच आले असल्याचे मान्य केले आहे. तसेच भारत गिड्डे यांनी न्यायालयामध्ये कशा पध्दतीने साक्ष देयची हे त्यांना सांगितले असल्याचे देखील मान्य केल आहे. त्यांना दृष्टीदोष असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. ते घटनास्थळी गेल्यानंतर पोलीसांनी सही करण्यास सांगितल्याने त्यांनी पंचनाम्यावर सही केली असल्याचे मान्य केले आहे. त्यांना घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांनी न्यायालयामध्ये सदर साक्ष ही भारत गिड्डे यांना मदत करण्याकामी नोंदवली असल्याचे देखील मान्य केले आहे.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ भारत विजय गिड्डे यांना निशाणी क्र. ३६ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे फिर्यादी यांचे पती आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, सदर घटना ही दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास धनगर गल्ली, नांद्रे येथे त्यांच्या घराच्या अंगणात घडली. दिपावली सणानिमित्त त्यांच्या दोन मुली त्यांच्या अंगणामध्ये फटाके उडवत होत्या. त्यावेळी आरोपी प्रकाश देसाई हे शिव्या देत त्यांच्या दारामध्ये आले आणि "फटाके उडवायचे बंद कर, माझी जनावरे भुजत आहेत" असे त्यांना म्हणाले. त्यावेळी त्यांनी आरोपी यांना "माझ्या लहान मुली लहान फटाके

उडवत आहेत, मी त्यांना बंद करण्यास सांगतो" असे म्हणाले व त्यावेळी ते त्यांच्या मुलींना सांगत असताना प्रकाश देसाई यांनी "तुझे नेहमीचे आहे, तु आमचा रस्ता वापरतोस, इथून पुढे या रस्त्यावरून ये जा करायची नाही, नाहीतर तुला जिवंत ठेवत नाही" असे म्हणत त्यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली. त्याचवेळी प्रकाश देसाई यांचा मुलगा प्रशांत देसाई हा काठी घेऊन आला. त्याच्या पाठोपाठ त्याची आई बेबी देसाई ही देखील आली व त्यांचा चुलत भाऊ महेश देसाई हे देखील त्यांच्या दारामध्ये शिव्या देत आले.

१७. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, प्रशांत देसाई यांनी त्यांना काठीने मारहाण केली. त्यावेळी त्यांची पत्नी व मुली भांडण सोडवण्याकरीता आल्या असता बेबी देसाई यांनी प्रशांत देसाई यांच्या हातातील काठी काढून घेऊन त्यांच्या पत्नीला काठीने मारहाण केली. त्यामध्ये त्यांच्या पत्नीच्या डाव्या हाताचा अंगठा व त्याच्या बाजूचे बोट मोडले. सदर मारहाणीमध्ये त्यांना पाठीवर व मांडीवर दुखापत झाली. त्यावेळी भांडणाचा आवाज ऐकून नामदेव माने, सोन्या माने, ओंकार माने, दिलीप माने हे त्याठिकाणी येऊन त्यांनी भांडणे सोडवली. तेथून ते व त्यांची पत्नी सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे तक्रार देण्याकरीता गेले. त्यावेळी पोलीसांनी वैदयकीय दाखला दिला व ते सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे उपचाराकरीता गेले व तेथून परत आल्यानंतर त्यांची पत्नी भारती गिड्डे यांनी सदर आरोपीविरुध्द तक्रार नोंदवली. पोलीसांनी या कामी त्यांचा जबाब नोंदवला. त्यांना मारहाण करण्यात आलेली काठी त्यांना दाखवल्यास ते ओळखू शकत असल्याचे त्यांनी कथन केल्याने सदर साक्षीदारास सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल काठी दाखवण्यात आली. सदर साक्षीदाराने जप्त मुद्देमाल काठी ही न्यायालयासमक्ष ओळखून त्या काठीनेच त्यांना व त्यांच्या पत्नीला आरोपींनी मारहाण केल्याचे कथन केले आहे. सदर मुद्देमालास निशाणी एम.ओ–१ देण्यात आली आहे. आरोपींना देखील त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

१८. सदर साक्षीदाराचा आरोपींच्या विधीज्ञांमार्फत विस्तृत उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सदर साक्षीदाराने सदर भांडण हे फटाके उडवण्याच्या कारणावरून झालेले होते हे नाकारले आहे. परंतु त्याला त्याचा जबाब दाखवला असता सदर भांडण हे फटाके उडवण्याच्या कारणावरून झाले असल्याचे त्यामध्ये नमूद केले असल्याचे मान्य केले आहे. त्यांच्या जबाबामध्ये त्यांच्या कोणत्या बाजूच्या मांडीला दुखापत झाली हे नमूद नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. नामदेव माने, सोन्या माने, ओंकार माने, दिलीप माने हे त्यांचे जवळचे मित्र असल्याचे व ते एकमेकांना अडीअडचणीच्या वेळी मदत करत असल्याचे मान्य केले आहे. दिनांक १४/११/२०२३ रोजी ते स्वतः फटाके उडवत असल्याचे त्यांनी नाकारले आहे. या व्यतिरिक्त सर्व प्रश्नांची त्यांनी नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

१९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ शितल विष्णू मस्कर यांना निशाणी क्र. ३९ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे जप्ती पंच आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६/११/२०२३ रोजी त्यांना पंचनाम्याकरीता कोणत्याही पोलीसांनी बोलावले नव्हते. त्यांना सदर जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यावरील अ. क्र. २ वरील सही मान्य करून त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

२०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ प्रिती भारत गिड्डे यांना निशाणी क्र. ४० वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार ही या खटल्यातील फिर्यादी यांची मुलगी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास सदरची घटना त्यांच्या

घराच्या अंगणामध्ये घडली. त्यावेळी त्या व त्यांची लहान बहिण श्रुती गिड्डे दिवाळी सणानिमित्त फटाके उडवत होत्या. त्यावेळी प्रकाश देसाई हे शिवीगाळी करत त्यांच्या अंगणामध्ये आले व "तुम्ही फटाके उडवत आहे त्यामुळे आमच्या जनावरांना त्रास होत आहे" असे म्हणत त्यांनी त्यांच्या वडीलांना शिवीगाळी केली. त्यावेळी त्यांच्या वडीलांनी "दिवाळी सणानिमित्त मुली फटाके उडवत आहेत, त्यांनी मी बंद करण्यास सांगतो" असे सांगितले असता आरोपी प्रकाश देसाई यांनी त्यांच्या वडीलांना "तुझे हे नेहमीचे आहे, तु आमचा रस्ता देखील वापरतोस, तुला आता सोडणार नाही" असे म्हणून धमकी दिली. त्यानंतर आरोपी प्रकाश देसाई यांनी त्यांच्या वडीलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

२१. त्यांनी पुढे असे सांगितले आहे की, त्यानंतर प्रकाश देसाई यांचा मुलगा, पत्नी बेबी देसाई, त्यांचा चुलत भाऊ हे शिवीगाळी करत त्यांच्या अंगणात आले. प्रशांत देसाई यांनी त्यांच्या वडीलांना काठीने मारहाण केली. प्रशांत देसाई हे त्यांच्या वडीलांना काठीने मारत असताना त्या, त्यांची आई व बहिण हे सोडवण्याकरीता मध्ये गेल्या असता प्रशांत देसाई यांच्या हातातील काठी बेबीताई यांनी घेऊन त्यांच्या आईला मारली. त्यामुळे त्यांची आई यांच्या डाव्या हाताचा अंगठा व बाजूचे बोट याला दुखापत झाली. त्यानंतर त्यांच्या वडीलांचे मित्र त्या ठिकाणी आले व त्यांनी वाद मिटवला. त्यानंतर ते पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेले असता पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे पाठवले. त्यांनी सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल काठी ही न्यायालयासमक्ष ओळखून सदर काठीनेच आरोपींनी त्यांच्या आईला व वडीलांना मारहाण केली असल्याचे कथन केले आहे. त्यांनी आरोपी यांना न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

२२. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये त्यांचे वडील व आरोपी प्रकाश देसाई यांच्यामध्ये रस्त्यावरून वाद असल्याचे त्यांना माहिती असल्याचे मान्य केले आहे. आरोपी प्रकाश देसाई यांनी त्यांना फटाके उडवू नका, आमची जनावरे भूजतात असे सांगितल्यावर त्यांचे वडील त्यांच्या घरातून बाहेर आले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदर घटना घडण्यापुर्वीपासून त्यांचे व आरोपी यांचे काहीही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. आरोपी प्रकाश देसाई ज्या वेळी फटाके उडवू नका असे सांगण्यास आले त्यावेळी त्यांची आई घरामध्ये असल्याची त्यांनी सांगितले आहे. सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल काठी हा बाजारात सहजपणे उपलब्ध होऊ शकत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. या व्यतिरिक्त आरोपी यांना सहाय्यक होतील अशा कोणत्याही बाबी उलटतपासणीमध्ये येऊ शकल्या नाहीत.

२३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ दिलीप मारूती माने यांना निशाणी क्र. ४३ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १४/११/२०२३ रोजी नांद्रे गावातील भारत गिड्डे यांच्या दारापुढे रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास सदर घटना घडली होती. त्यावेळी ते त्यांच्या घरी असताना त्यांना दंगा ऐकू आल्याने ते त्या ठिकाणी गेले. ते त्या ठिकाणी गेल्यानंतर मारामारी सुरु असल्याची त्यांनी पाहिली होती. प्रशांत देसाई हा हातात काठी घेऊन भारत गिड्डे यांना मारहाण करत होता. त्याठिकाणी प्रशांत देसाई यांची आई बेबीताई आल्या व प्रशांत याच्या हातातील काठी घेऊन त्यांनी भारत गिड्डे यांच्या पत्नीला व दोन मुलींना मारली. त्या वेळी त्यांनी, ओंकार माने, अविनाश माने यांनी सदर भांडणाची सोडवासोडव केली. सदर भांडण हे फटाके उडवण्यावरून झाले असल्याचे त्यांना त्या ठिकाणी समजले. ज्या काठीने आरोपी यांनी मारहाण केली होती ती आता ते ओळखू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांनी सर्व आरोपी यांना न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

२४. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये घटना घडली त्या दिवशी दिवाळी पाडव्याचा सण असल्याचे व नांद्रे गावातील बिरोबा मंदिरामध्ये दिवाळी पाडव्याला रात्री ०८.०० ते ११.०० पर्यंत ढोल वाजवण्याचे प्रथा असल्याचे मान्य केले आहे. घडलेल्या घटनेबाबत त्यांनी स्वतःहून पोलीसांना काहीही सांगितले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. दिनांक १४/११/२०२३ रोजी घडलेल्या घटनेबाबत त्यांना लोकांकडून माहिती मिळाली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

२५. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ राहुल आण्णा कोळी यांना निशाणी क्र. ४६ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६/११/२०२३ रोजी सांगली ग्रामीण पोलीसांनी त्यांना पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीसांनी त्या दिवशी त्यांच्यासमक्ष काही जप्त केले असे काही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांना सदरचा जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यावरील त्यांची स्वाक्षरी मान्य करून त्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर पंच साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्यक अशी साक्ष नोंदवित नसल्याने सरकारी वकिलांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरूपात उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

२६. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारक क्र. ८ डॉ. महानंदा मधुकर हुबाले यांना निशाणी क्र. ५० वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी त्या वैदयकीय अधिकारी म्हणून सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे कार्यरत असताना भारत गिड्डे व भारती गिड्डे हे सांगली ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीस यादीसह रात्री १२.२५ व रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्याकडे उपचाराकरीता आले होते. सदर रुग्णांना नांद्रे येथे रात्री ०९.३०

वाजताच्या सुमारास ओळखीच्या चार व्यकतींनी काठीने मारहाण केली असल्याचे त्यांना सांगितले होते. त्यांनी प्रथम भारत गिड्डे यांना तपासले. भारत गिड्डे यांनी त्यांना पाठीवर मार लागल्याचे सांगितले होते. त्यांना तपासणीमध्ये भारत गिड्डे यांच्या डाव्या कोप–यावर साधा ओरखडा आढळून आला होता. सदर ओरखडा हा सहा तासांच्या आतील व साध्या स्वरूपाचा असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर ओरखडा हा कठीण व बोथट वस्तूने झाला असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्याप्रमाणे त्यांनी भारत गिड्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र जारी केले. त्यांना भारत गिड्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र दाखवले असता त्यांनी त्यावर त्यांची सही व दवाखान्याचा शिक्का असल्याचे व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केल्याने सदर प्रमाणपत्रास निशाणी पी–५ देण्यता आली आहे.

२७. त्यानंतर त्यांनी भारती गिड्डे यांची तपासणी केली असल्याचे कथन केले आहे. भारती गिड्डे यांनी त्यांना उजव्या कोप–यावर व डाव्या हाताच्या बोटाला मार लागल्याचे सांगितले होते. त्यांची तपासणी केल्यानंतर त्यांना बाहेरील बाजूस कोणतीही जमख आढळली नसल्याने त्यांनी सदर रुग्णाला क्ष–किरण करण्याचा सल्ला दिला व त्यामध्ये डाव्या हाताचे बोट मोडल्याने गंभीर दुखापत झाली असल्याचे आढळून आले. त्याप्रमाणे त्यांनी सदर रुग्णाचे वैदयकीय प्रमाणपत्र जारी केले. त्यांना भारती गिड्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र दाखवले असता त्यांनी त्यावर त्यांची सही व दवाखान्याचा शिक्का असल्याचे व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केल्याने सदर प्रमाणपत्रास निशाणी पी–६ देण्यता आली आहे. सदर दोन्ही रुग्णांना झालेल्या दुखापती या लाकडी काठीने मारहाण केल्याने होऊ शकत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

२८. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये भारती गिड्डे यांना खरचटले किंवा मुका मार लागला नसल्याचे मान्य केले आहे. भारती गिड्डे यांना नेमक्या कोणत्या

बोटाला दुखापत झाली होती याबाबत त्यांच्या वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद केले नसल्याचे मान्य केले आहे. सदर दोन्ही रुग्णांना झालेल्या जखमा या पडल्यामुळे होऊ शकत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

२९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ संतोष बाबूराव माने यांना निशाणी क्र. ५४ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे या खटल्याचे तपासी अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी ते सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्या दिवशी ठाणे अंमलदार संजय बनसोडे यांनी गु. र. क्र. ३४९/२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपासकामी त्यांना लेखी आदेशान्वये दिला. त्यांना सदरचा लेखी आदेश दाखवला असता त्यांनी तो मान्य केल्याने त्यास निशाणी पी–७ देण्यात आली आहे. त्यानंतर ते तपासकामी घटनास्थळी गेले. घटनास्थळ त्यांना फिर्यादी यांनी दाखवले. सदर घटनास्थळ हे फिर्यादी यांच्या राहत्या घरासमोर असलेल्या कच्चया रोडवर होते. त्या ठिकाणी दोन पंचांना बोलावून घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर दिनांक १६/११/२०२३ रोजी आरोपी यांना चौकशी कामी पोलीस ठाण्यात बोलावले. आरोपी प्रकाश देसाई यांनी गुन्हयात वापरलेली काठी दोन पंचांसमक्ष हजर केली होती त्याचा दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा केला. सदर जप्ती पंचनामा त्यांनी मान्य केल्याने त्यास निशाणी पी–८ देण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी जप्त केलेली काठी मुद्देमाल कारकुन यांच्याकडे पावती करून जमा केली. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल काठी त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखली आहे.

३०. त्यानंतर गुन्हयातील साक्षीदार यांचे तपासटिपण नोंदवले. तसेच वैदयकीय अधिकारी यांना जखमींना झालेल्या मारहाणीबाबत प्रमाणपत्र मिळण्याकरीता पत्र व्यवहार केला. त्यांना दिनांक २७/११/२०२३ रोजीचे वैदयकीय अधिकारी यांना

दिलेले पत्र दाखवले असता त्यांनी त्यातील मजकूर मान्य केल्याने सदर पत्रास निशाणी पी–९ देण्यात आली आहे. त्यानुसार वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर जखमी यास गंभीर दुखापत झाली असल्याचे आढळून आल्याने सदर आरोपींच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२६ प्रमाणे वाढीव कलम लावण्याचा अहवाल सादर केला. त्यांना सदरचा अहवाल दाखवला असता त्यांनी त्यावर त्यांची स्वाक्षरी असल्याचे व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केल्याने सदर अहवालास निशाणी पी–१० देण्यात आली आहे. संपुर्ण तपासामध्ये आरोपी यांनी फिर्यादी व जखमी यांना काठीने, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळी केली असल्याचे निष्पन्न झाले. वरील सर्व बाबी त्यांनी शपथेवर कथन केल्या आहेत. त्यांनी आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

३१. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या विधीज्ञांमार्फत विस्तृत उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये निशाणी पी–७ वरील लेखी आदेशामध्ये ठाणे अंमलदार बनसोडे यांचे नाव कोठेही नमूद नसल्याचे व सदर लेखी आदेश हा त्यांना मिळाला असल्याबाबत कोणताही लेखी पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे मान्य केले आहे. सदर दोषारोप पत्रासोबत मुद्देमाल रजिस्टरचा उतारा दाखल केला नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. निशाणी पी–१० वरील नमूद केलेल्या तारखेमध्ये खाडाखोड असून त्या संदर्भात त्या ठिकाणी कोणाची सही नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

३२. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्त्वानुसार आरोपी निर्दोष मानले जातात

जोपर्यंत त्यांचा दोष संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नाही. शंका, अनुमान किंवा संभाव्यता यांवर दोषारोप टिकू शकत नाही.

३३. अभिलेखावरील आलेल्या साक्षीपुराव्यांवरून हे स्पष्ट होते की, फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहतात व त्यांच्यात रस्त्याच्या वापराबाबत पूर्वीपासून वाद अस्तित्वात होता. सदर घटना दिवाळी सणाच्या दिवशी फटाके वाजवण्याच्या कारणावरून घडल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर हा वाद पूर्व वैमनस्यातून उद्भवलेला असून तात्कालिक कारणाने भडकलेला आहे. त्यामुळे साक्षीदारांच्या साक्षीचे परीक्षण अधिक काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. त्यामध्ये साक्षीदार क्र. १ भारती गिड्डे या फिर्यादी असून त्यांनी मुख्य तपासात आरोपींनी काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले आहे. परंतु फिर्यादी साक्षीदाराने ज्या काठीने आरोपींनी त्यांना मारहाण केली ती काठी ओळखलेली नाही. सदर बाब ही अत्यंत महत्त्वाचा दोष असून त्यामुळे फिर्यादी साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याच्या विश्वासार्हतेवर गंभीर परिणाम करतो.

३४. साक्षीदार क्र. ३ भारत गिड्डे हे जखमी साक्षीदार असून जखमी साक्षीदाराची साक्ष सामान्यतः विश्वासार्ह मानली जाते. तथापि या प्रकरणात त्यांच्या साक्षीमधून घटनेचे कारण बदलणे, स्वतःच्या जबाबाशी विसंगती व जखमांचे स्वरूप यामध्ये विसंगती आढळून येत आहेत. सदर जखमी साक्षीदाराने गंभीर मारहाणीचा दावा केला असताना वैद्यकीय पुराव्यात केवळ साधा ओरखडा दिसतो. यावरून त्याची साक्ष अतिशयोक्तीपूर्ण (exaggerated) वाटते. तसेच या कामी अभियोगपक्षाने तपासलेले साक्षीदार क्र. ५ प्रिती गिड्डे ही फिर्यादी यांची मुलगी असून तिची साक्ष ही पुर्णपणे कुटुंबिय साक्षींशी जुळणार आहे व ती स्वतंत्र पुष्टी देत नाही. अशा परिस्थितीत तिची साक्ष स्वारस्य साक्षीदार (interested testimony) म्हणून सावधगिरीने

स्वीकारावी लागते. घटना पूर्वनियोजित नसून अचानक वादातून घडलेली असल्याचे देखील दिसून येते.

३५. अभियोगपक्षाने तपासलेले साक्षीदार क्र. २ हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्याने उलटतपासणीमध्ये त्याचे फिर्यादी यांच्याशी जवळचे संबंध असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्याने फिर्यादी यांना मदत करण्याकामी त्याने न्यायालयामध्ये साक्षीपुरावा नोंदवला असल्याचे देखील मान्य केले आहे. अशा साक्षीदाराची साक्ष न्यायालय विश्वासार्ह मानू शकत नाही. तसेच या कामी तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ४ व साक्षीदार क्र. ७ हे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोगपक्षास सहाय्यक होईल असा साक्षीपुरावा नोंदवलेला नाही. त्यांनी त्यांच्यासमक्ष पोलीसांनी कोणताही जप्ती पंचनामा केला नसल्याचे व पंचनाम्यातील मजकूर माहिती नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा कायदेशीरदृष्ट्या अप्रमाणित राहतो.

३६. साक्षीदार क्र. ६ दिलीप माने हे स्वतंत्र साक्षीदार म्हणून अभियोगपक्षाने तपासलेले आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासणीमध्ये मारहाण केल्याची घटना पाहिली असल्याचे सांगितले असले तरी उलटतपासणीमध्ये सदर माहिती ही लोकांच्याकडून मिळाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्याचा साक्षीपुरावा हा अविश्वसनीय व ऐकीव स्वरुपाचा ठरतो.

३७. साक्षीदार क्र. ८ हे वैदयकीय अधिकारी असून त्यांच्या वैद्यकीय पुराव्याचे विश्लेषण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी जमखी साक्षीदार भारत गिड्डे यांना झालेली जखम एक साधा ओरखडा असल्याचे व ती गंभीर दुखापत नसल्याचे कथन केले आहे. तसेच फिर्यादी भारती गिड्डे यांना कोणतीही बाहय जखम आढळून आली नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी उलटतपासणीमध्ये फिर्यादी भारती गिड्डे यांच्या वैदयकीय

प्रमाणपत्रामध्ये त्यांना कोणत्या बोटाला गंभीर दुखापत झाली होती हे स्पष्टपणे नमूद केले नसल्याचे मान्य केले आहे. सदर दोन्ही रुग्णांना झालेल्या जमखा या पडल्यानेही होऊ शकत असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यामुळे त्यांचा वैद्यकीय पुरावा त्यांच्या मौखिक साक्षीला पुष्टी देत नाही.

३८. सदर खटल्याचे तपासी अधिकारी यांनी उलटतपासणीमध्ये लेखी आदेश त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांच्याकडे कोणताही लेखी पुरावा नसल्याचे व ज्या ठाणे अंमलदार यांनी सदर खटल्याचा तपास करण्याचा त्यांना लेखी आदेश दिला त्यांचे नाव कोठेही सदर आदेशामध्ये नमूद नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे लेखी आदेशामध्ये विसंगती निर्माण झालेली आहे. तसेच सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल हा मुद्देमाल कारकुन यांच्याकडे पावती करून जमा केला असल्यासंदर्भात तसे कोणतेही मुद्देमाल रजिस्टर तपासी अंमलदार यांनी सदर दोषारोप पत्रासमवेत सादर केले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तपासी अंमलदार यांनी कथन केल्याप्रमाणे वैदयकीय अधिका-यांच्या प्रमाणपत्रामधून फिर्यादी यांना जी गंभीर स्वरूपाची जखम त्यांना आढळून आली त्या संदर्भात त्यांनी वाढीव कलम अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या तारेखमध्ये खाडाखोड केली असून त्या संदर्भात तेथे कोणाचीही स्वाक्षरी नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सदर तपासाची शुद्धता व विश्वासार्हता संशयास्पद ठरते.

३९. सदर खटल्यामध्ये जप्त मुद्देमाल काठी ही फिर्यादी साक्षीदार ओळखू शकला नाही. तसेच जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार यांनी त्या संदर्भात समर्थन केले नाही. त्यामुळे सदर खटल्यामध्ये काठीचा वापर सिध्द होऊ शकलेला नाही. अभिलेखावरील पुराव्याचे एकत्रित मुल्यमापन केले असता बहुतेक साक्षीदार हे फिर्यादी यांचे संबंधित किंवा मित्र असल्याचे निदर्शनास येते. अभियोगपक्षाने स्वतंत्र निष्पक्ष साक्षीदार या कामी तपासलेले दिसून येत नाहीत. सर्व पुराव्यांमधून घटनेचे कारण,

फिर्यादी व जखमी साक्षीदार यांच्या जखमांचे स्वरूप व मारहाणीचा तपशील यामध्ये गंभीर विसंगती आढळून आलेल्या आहेत. तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये असलेला रस्त्याचा वाद यामुळे पुर्व वैमनस्यातून खोटया गुन्हयामध्ये गुंतवल्याची शक्यता नाकारता येणार नाही. अभिलेखावरील आलेल्या संपुर्ण पुराव्याची साखळी अपूर्ण राहत असल्याने व अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचा दोषारोप पुर्णतः सिध्द करू शकला नसल्याचे आरोपींविरुध्दचे भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा सिध्द होऊ शकला नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देणे आवश्यक आहे.

४०. सदर प्रकरणातील पुराव्याचे परीक्षण करता असे आढळून येते की, संबंधित घटनेशी निगडित बाबींमध्ये तपास अधिकाऱ्यांची एकसंधता आढळत नाही. फौजदारी न्यायप्रक्रियेत, विशेषतः एकाच व्यवहारातून किंवा परस्पर संबंधित घटकांमधून उद्भवलेल्या प्रकरणांमध्ये तपासाची सुसंगती (consistency) व अखंडता (continuity) राखणे अत्यावश्यक असते. यासाठी शक्यतो एकाच तपास अधिकाऱ्याकडून तपास करण्यात येणे अपेक्षित असते, जेणेकरून घटनाक्रमाची साखळी, पुराव्यांचे संकलन, व साक्षीदारांचे जबाब यामध्ये सुसंगती राहील. मात्र सदर प्रकरणात भिन्न तपास अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या टप्प्यांवर तपास केल्याचे दिसून येते, आणि त्या संदर्भात तपास हस्तांतरणाची कारणे, नोंदी किंवा सातत्य दर्शविणारा कोणताही विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. यामुळे तपास प्रक्रियेत सुसंगतीचा अभाव निर्माण होतो व पुराव्यांच्या साखळीमध्ये तुटकपणा (break in chain) निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. परिणामी, तपासाची विश्वसनीयता बाधित होते व अभियोगपक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो. अशा परिस्थितीत न्यायालयास अशा त्रुटींचा विचार आरोपींच्या फायद्यासाठी करणे भाग पडते.

**४१.** फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत असा आहे की अभियोग पक्षाने आपला खटला संशयाच्या पलीकडे सिद्ध करणे आवश्यक आहे. जर पुराव्यामध्ये शंका निर्माण होत असेल तर त्या शंकेचा फायदा आरोपींना द्यावयाचा असतो. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ५ यांचे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र. ६ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १ | **आरोपी क्र. १ प्रकाश गणपतराव देसाई, आरोपी क्र. २ प्रशांत प्रकाश देसाई, आरोपी क्र. ३ बेबीताई प्रकाश देसाई व आरोपी क्र. ४ महेश नारायण देसाई** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२४, ३२६, ५०४, ५०६, ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपी क्र. १ ते ४ यांचा जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | जप्त मुद्देमाल एक काळपट रंगाची तीन पेराची ८२ सेमी लांबीची, ४ सेमी व्यास असलेली कळकाची काठी तिच्या एका बाजूस तार बांधलेली ही मुल्यहीन असल्याने ती अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा. |
| ४ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रु.२५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

JUBER SHABBIR MAKANDAR

Digitally signed by JUBER SHABBIR MAKANDAR
Date: 2026.03.20 18:04:48 +0530

**सांगली.**

**दि. २०/०३/२०२६**

**( जुबेर शब्बीर मकानदार )**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ०४,**

**सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment is same word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the stenographer | : | P. D.Tingare |
| (b) | Court | : | J. S. Makandar<br>04th Jt.Civil Judge Jr.Dn.&<br>J.M.F.C.,Sangli |
| (c) | Judgment/Order signed by P.O. on | : | 20/03/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | : | 20/03/2026 |